-२५

महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम
ग्रामपंचायत निवडणूक आचारसंहितेच्या कालावधीत सरपंच व उप सरपंच यांच्या कर्तव्याबाबत.

महाराष्ट्र शासन
**गृह विभाग**

शासन परिपत्रक क्रमांक तंमुगा-१००८/प्र.क्र. २२/पोल-१५,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३ सप्टेंबर २००७.

**वाचा**.— (१) गृह विभाग, शासन निर्णय, क्रमांक एमआयएस. १००७/सीआर-२३८/पोल-८, दिनांक १९ जुलै २००७.
(२) राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचे पत्र क्र. रानिआ/ग्रापंनि/२००७/प्र.क्र.८/का-८, दिनांक २२ ऑगस्ट २००७.

**शासन परिपत्रक**

शासन निर्णय, क्रमांक एमआयएस. १००७/सीआर-२३८/पोल-८, दिनांक १९ जुलै २००७ अन्वये " महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम " दिनांक १५ ऑगस्ट २००७ पासून राज्यात सुरू करण्यात आली आहे. संदर्भित दिनांक २२ ऑगस्ट २००७ च्या आदेशान्वये राज्य निवडणूक आयोगाने राज्यातील माहे नोव्हेंबर व डिसेंबर, २००७ मध्ये मुदत संपणा-या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक/पोट-निवडणुकींचा निवडणूक कार्यक्रम घोषित करून त्याबाबत आचारसंहिता लागू केली आहे. उक्त संदर्भ क्रमांक १ मधील शासन निर्णयातील परिच्छेद-६.(३) (१) (अ) यामध्ये तंटामुक्त गाव समितीची रचना देण्यात आली असून सदर समितीत ग्रामपंचायतीचे सरपंच व उप सरपंच हे पदसिद्ध सदस्य आहेत. ग्रामपंचायतीच्या निवडणुका/पोटनिवडणुकांच्या आचारसंहितेच्या कालावधीत सरपंच व उप सरपंच यांनी तंटामुक्त गाव समितीच्या कामकाजात भाग घेणे अपेक्षित नाही.

२. या अनुषंगाने निदेश देण्यात येत आहेत की, ज्या गावांमध्ये तंटामुक्त गाव समिती स्थापन केली आहे, जी गावे महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेमध्ये सहभागी झालेली आहेत आणि ज्या गावांमध्ये ग्रामपंचायतींच्या निवडणुकीच्या अनुषंगाने राज्य निवडणूक आयोगाकडून आचारसंहिता लागू करण्यात आली आहे, अशा गावांतील ग्रामपंचायतींच्या निवडणुकांच्या कालावधीत संबंधित गावांचे सरपंच व उप सरपंच हे तंटामुक्त गाव समितीचे सदस्य म्हणून काम पाहू शकणार नाहीत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

POL(II)
DC
1919

जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी
शाखा:-
आवक नं.:- DC
8 82C9e
10 SEP 2007
विशेष नोंद वही नं.:-

मा.आ.गुट्टे

**( मा. आ. गुट्टे )**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग.

महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम
ग्रामपंचायत निवडणूक आचारसंहितेच्या कालावधीत सरपंच व उप सरपंच यांच्या कर्तव्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

## गृह विभाग

शासन परिपत्रक क्रमांक तंमुगा-१००८/प्र.क्र. २२/पोल-१५,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३ सप्टेंबर २००७.

**वाचा**.— (१) गृह विभाग, शासन निर्णय, क्रमांक एमआयएस. १००७/सीआर-२३८/पोल-८, दिनांक १९ जुलै २००७.
(२) राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचे पत्र क्र. रानिआ/ग्रापंनि/२००७/प्र.क्र.८/का-८, दिनांक २२ ऑगस्ट २००७.

**शासन परिपत्रक**

शासन निर्णय, क्रमांक एमआयएस. १००७/सीआर-२३८/पोल-८, दिनांक १९ जुलै २००७ अन्वये " महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम " दिनांक १५ ऑगस्ट २००७ पासून राज्यात सुरू करण्यात आली आहे. संदर्भित दिनांक २२ ऑगस्ट २००७ च्या आदेशान्वये राज्य निवडणूक आयोगाने राज्यातील माहे नोव्हेंबर व डिसेंबर, २००७ मध्ये मुदत संपणा-या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक/पोट-निवडणुकींचा निवडणूक कार्यक्रम घोषित करून त्याबाबत आचारसंहिता लागू केली आहे. उक्त संदर्भ क्रमांक १ मधील शासन निर्णयातील परिच्छेद-६.(३) (१) (अ) यामध्ये तंटामुक्त गाव समितीची रचना देण्यात आली असून सदर समितीत ग्रामपंचायतीचे सरपंच व उप सरपंच हे पदसिद्ध सदस्य आहेत. ग्रामपंचायतीच्या निवडणुका/पोटनिवडणुकांच्या आचारसंहितेच्या कालावधीत सरपंच व उप सरपंच यांनी तंटामुक्त गाव समितीच्या कामकाजात भाग घंणे अपेक्षित नाही.

२. या अनुषंगाने निदेश देण्यात येत आहेत की, ज्या गावांमध्ये तंटामुक्त गाव समिती स्थापन केली आहे, जी गावे महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेमध्ये सहभागी झालेली आहेत आणि ज्या गावांमध्ये ग्रामपंचायतींच्या निवडणुकीच्या अनुषंगाने राज्य निवडणूक आयोगाकडून आचारसंहिता लागू करण्यात आली आहे, अशा गावांतील ग्रामपंचायतींच्या निवडणुकांच्या कालावधीत संबंधित गावांचे सरपंच व उप सरपंच हे तंटामुक्त गाव समितीचे सदस्य म्हणून काम पाहू शकणार नाहीत.

POL(II)
DE
1919

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी
शाखा-
आवक नं.:- DC
82C9e
10 SEP 2007
विशेष नोंद वही नं.:-

मा.आ.गुट्टे

( मा. आ. गुट्टे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग.